# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक ८७-२२ दिनांक - १७/०३/२०२२

## होळी, धुलीवंदन, शब-ए-बारात, छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तिथीप्रमाणे) व रंगपंचमी सणांच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्तांचे मनाई आदेश लागू.

दिनांक १७/०३/२०२२ रोजी होळी, दिनांक १८/०३/२०२२ धुलीवंदन/शब ए बारात, दिनांक २१/०३/२०२२ छत्रपती शिवाजी महाराज जयंती तिथीप्रमाणे व दिनांक २२/०३/२०२२ रोजी रंगपंचमी असे हिंदु/मुस्लीम बांधवांचे सण/उत्सव साजरे होणार आहेत. सदरील कालावधीमध्ये मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, लोकांना कोणताही त्रास, अडथळा, दुखापत, जिवीतास धोका, आरोग्यास धोका अथवा सार्वजनिक शांततेस बाधा अथवा दंगा, मारामारी होवु नये व त्यास प्रतिबंध केला जावा तसेच नागरिकांचे जिवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), यांनी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये खालीलप्रमाणे मनाई आदेश लागू केलेले आहे.

१. सार्वजनिक ठिकाणातील झाडे/लाकडे तोडणे, जाळणे, दहन करणे.
२. सदर सणाच्या निमित्ताने रस्त्यावरुन जाणाऱ्या दुचाकी, चारचाकी व इतर वाहनांना अडवुन त्यांचेकडुन पैशांची मागणी करणे.
३. रंगीत पाणी, रंग किंवा पादचाऱ्यावर पावडर फेकणे अथवा उडविण्याचा प्रयत्न करणे.
४. आरोग्यास अपायकारक होईल अशी रासायनिक रंगाचा वापर करणे.
५. रंगाचे फुगे, पाण्याचे फुगे अथवा इतर द्रव पदार्थाचे फुगे बनविणे अथवा प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर करुन फेकल्यामुळे आरोग्यास अपाय अथवा जिवास धोका निर्माण होईल असे कृत्य करणे.
६. सार्वजनिक जागेत अश्लिल शब्द उच्चारणे, घोषणा देणे, अश्लिल गाणी गाणे.
७. सार्वजनिक जागेत हावभाव करणे किंवा वाकुल्या व विटंबनाचे प्रदर्शन करणे/भरविणे किंवा चित्रे/चिन्हे/प्रतिकृती अथवा कोणतेही वस्तुंचे अथवा उद्देशांचे की, ज्यामुळे एखादयाची प्रतिष्ठा, योग्यता वा नैतिकतेला धक्का पोहचेल अशी कृती करणे.

सदरील मनाई आदेश हा दिनांक १७/०३/२०२२ रोजीचे ००.०१ वाजे पासुन ते दिनांक २२/०३/२०२२ रोजीचे २४.०० वाजे पर्यंत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्राकरिता अंमलात राहणार आहे.

---ooo---